राष्ट्रीय आरोग्य अभियान
कंत्राटी पदभरती प्रक्रीया
जिल्हा - नंदुरबार

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत नंदुरबार जिल्हयासाठी पदभरती प्रक्रिया खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे कंत्राटी व करार पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर खालील पदांसाठी पात्र उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | एकुण पदे | शैक्षणिक अर्हता | प्रवर्ग | मंजुर मानधन |
|---|---|---|---|---|---|
| 1 | योग प्रशिक्षक Urban-HWC | UHWC करिता-3 | मान्यता प्राप्त विद्यापीठ/योग संस्थेचे योग पदवी/पदवीका प्रमाणपत्र (कमीत-कमी सहा महिन्याचे पदवी/पदवीका), अनुभव प्रमाणपत्र (असल्यास) | खुला | Urbarn-HWC 250/-रु प्रति योग सत्र |
| 2 | योग प्रशिक्षक HWC-Ayush | HWC-Ayush करिता-5 | मान्यता प्राप्त विद्यापीठ/योग संस्थेचे योग पदवी/पदवीका प्रमाणपत्र (कमीत-कमी सहा महिन्याचे पदवी/पदवीका), अनुभव प्रमाणपत्र (असल्यास) | खुला | HWC-Ayush 500/- रु प्रति योग सत्र |

**अटी व शर्ती** :-

1) आरोग्यवर्धिनी कार्यक्रमांतर्गत जिल्हयातील, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र (Urban-HWC) व आयुष आरोग्यवर्धिनी केंद्रास्तरावर(HWC-Ayush) योग सत्र आयोजित करावयाचे आहेत.
2) योग शिक्षक यांना योग सत्र घेण्यासाठी Urbarn-HWC 250/-रु प्रति योग सत्र व HWC-Ayush 500/- रु प्रति योग सत्र प्राति आठवडा प्रति आरोग्य संस्था याप्रमाणे मानधन देण्यात येईल. या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे प्रवास भत्ता, इंधन खर्च, दैनिक भत्ता देय असणार नाही.
3) योग शिक्षक प्रति दिन जास्तीत जास्त दोन आरोग्य संस्थेच्या ठिकाणी योग सत्र घेऊ शकतात. यापेक्षा जास्त योग सत्र घेता येणार नाहीत जास्तीचे योग सत्र घेतल्यास सदर जास्तीचे योग सत्राचे मानधन देय असणार नाही.
4) योग शिक्षक हे पद राज्य शासनाचे नियमित सेवेतील पद नसुन निव्वळ कंत्राटी पध्दतीवरील सत्रनिहाय मानधनवरील असल्याने सदर पदावर कायमपणाचा हक्क असणार नाही. तसेच शासनाचे सेवा नियम लागु राहणार नाही.
5) इच्छुक उमेदवारांनी विहीत नमुन्यातील अर्ज 1) वयाचा पुरावा 2) पदवी/पदविका प्रमाणपत्र (सर्व वर्षांचे प्रमाणपत्र) 3) गुणपत्रिका 4) कौन्सील रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र (As Applicable) 5) शासकीय/निमशासकीय संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र 6) जात प्रमाणपत्र इ.छायांकित प्रतींसह दि 16 /12/2022 रोजी सायं 6:00 वा.या कालावधीतपर्यंत **आरोग्य विभाग, जिल्हा परिषद,नंदुरबार या पत्त्यावर** पोष्टाद्वारे

कुरियर अथवा प्रत्यक्षात (By Hand) सादर करण्यात यावे. दि.16/12/2022 नंतर आलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

6) शुल्क - उमेदवारांनी रु 100/- चा राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राफ्ट " District Integrated Health & Family Welfare Society,Nandurbar " या नावाने देय असलेला असावा. बँकेचा डिमांड ड्राफ्ट सादर न केल्यास आपला अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

7) पदासमोर नमुद मानधन हे एकत्रित मानधन असुन त्या व्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते देय राहणार नाही.

8) सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय मुंबई यांचे दिनांक 25 एप्रिल 2016 चे शासन निर्णयास अनुसनरुन अर्ज करण्याच्य शेवटच्या दिनांकास उमेदवाराचे किमान वय 18 वर्ष असणे आवश्यक आहे.

9) लहान कुटुंबाची अट दि.23/07/2020 पासुन लागु करण्यात आली असुन दि.23/07/2020 पासुन दोनपेक्षा अधिक मुले असणारे उमेदवार राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या पदभरतीसाठी अर्ज करण्यास पात्र ठरणार नाहीत.

10) वरील सर्व पदे (Part Time) कंत्राटी स्वरुपाची व एकत्रित मानधनाची असुन,त्यांचा कालावधी अकरा महिने किंवा त्यापेक्षा कमी कालावधीसाठी भरण्यात येणार आहेत अथवा त्या आधी मंजुरी न मिळाल्यास पदे कधीही समाप्त करण्यात येतील.

11) वरील नमुद पदे ही राज्य शासनाची पदे नसून निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. सदर पदावर शासकीय सेवेप्रमाणे असलेले नियम अटी व शर्ती याबाबतचा हक्क व दावा राहणार नाही तसेच या पदासाठी शासनाचे सेवा नियम लागु नाहीत.

12) केंद्र/राज्य शासनाने संबंधित पदे नामंजूर केल्यास उमेदवाराची सेवा कोणतीही पुर्वसुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल.

13) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदारा विरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

14) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनुसार ठिकाण बदलुन मिळण्याची मागणी करता येणार नाही. अर्जदारांनी आपल्या अर्जावर त्यांच्या सध्या सुरु असलेला मोबाईल नंबर व ई-मेल आयडी अचुक नोंदवाव. तसेच ते भरती प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सुस्थितीत राहील याची दक्षता घ्यावी.

15) भरती प्रक्रिये दरम्यान ज्या-ज्या उमेदवारांना बोलविण्यात येईल,त्या-त्या वेळी यांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल तसेच सदर उपस्थिती करीता कोणतेही मानधन अथवा प्रवास खर्च देय राहणार नाही.

16) अर्जाचा नमुना जाहिराती सोबत प्रसिध्द करण्यात आलेला असुन सदरील नमुन्याप्रमाणे अर्ज नसल्यास उमेदवारांचा अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही.

17) उमेदवारांचा अर्ज अपुर्ण व अर्धवट भरलेला असल्याने नाकारला गेल्यास सर्वस्वी जबाबदारी ही उमेदवारांची राहील .

18) भरती प्रक्रियेच संपुर्ण अधिकार, पदे कमी - जास्त करणे, भरती प्रक्रिया रदद करणे, अटी व शर्तीमध्ये बदल करणे, पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल करणे, इत्यादी सर्व अधिकार हे या कार्यालयाचे असून निवड प्रक्रियेत कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकारी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार यांनी राखुन ठेवलेले आहेत.

# अर्जाचा नमुना

------------------------या पदासाठी अर्ज

पासपोर्ट
फोटो

संपूर्ण नाव | मराठी | इंग्रजी (कॅपीटल लेटर)

1) आडनाव ------------------------------ ------------------------------

2) स्वत : चे नाव ------------------------------ ------------------------------

3) वडिलांचे/पतीचे नाव ------------------------------ ------------------------------

4) आईचे नाव ------------------------------ ------------------------------

पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता पिनकोडसहित

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

दुरध्वनी/मोबाईल क्रमांक 1)------------------------------ 2)------------------------------

ई मेल आयडी - ------------------------------------------------------------

5) जन्मतारीख

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

6) दि.    /    /2022 रोजीचे वय

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

7) प्रवर्ग नमुद करताना केसात बरोबरची ( ) अशी खुन करावी.

| अ.जा | अ.ज | वि.जा.अ | भज (ब) | भज (क) | भज (क) | वि.मा.प्र | इ.मा.व | ईडब्ल्युएस | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| SC | ST | VJ.A | NT B | NT C | NT D | SBC | OBC | EWS | Open |
| | | | | | | | | | |

8) शैक्षणिक अर्हता

| अ.क्र | उत्तीर्ण केलेली परीक्षा | विदयापीठ | परीक्षा उत्तीर्ण वर्ष | टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

9) अनुभव

| संस्थचे नाव | कालावधी | | एकुण वर्ष |
|---|---|---|---|
| | पासुन | पर्यंत | |
| | | | |
| | | | |
| | | | |

10) अर्जदार महाराष्ट्राचा अधिवासी आहे काय ? होय / नाही

11) मी असे प्रमाणित करतो/करते की, वर नमुद केलेली माहिती खरी असून ती खोटी आढळल्यास मा उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करणेत येईल आणि माझे विरुध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

अर्जदाराची सही

ठिकाण : (अर्जदाराचे नाव : )

दिनांक :